आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२७ डिसेंबर २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या मन की बात द्वारे देशवासियांशी संवाद साधणार

- राज्यातल्या महापालिका निवडणुकीसाठी युती आणि आघाडीमध्ये चर्चा सुरूच

- हैदराबादमध्ये गेल्यावर्षी झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी अभिनेता अल्लु अर्जूनसह २३ जणांविरोधात आरोपपत्र दाखल

आणि

- थायलंड आणि कंबोडियामध्ये युद्धबंदी करार, मात्र त्यानंतर थायलंडनं हवाई हल्ले केल्याचा कंबोडियाचा आरोप

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता मन की बात या कार्यक्रमातून जनतेसमोर आपले विचार मांडणार आहेत . हा या कार्यक्रमाचा १२९ वा भाग असून त्याचं थेट प्रसारण आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, एआयआर न्यूज या संकेतस्थळावर आणि न्यूज ऑन एअर मोबाईल ॲपवर केलं जाणार आहे. त्याचप्रमाणे AIR न्यूज, डीडी न्यूज तसेच प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब वाहिन्यांवरून हा कार्यक्रम थेट प्रक्षेपित होणार आहे.

**<><><><><>**

आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी महायुतीतल्या घटक पक्षांमधे चर्चा सुरू असून युती होण्यात कसलीही अडचण नसल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. अमरावती इथं भाऊसाहेब देशमुख स्मृती पुरस्कार सोहळ्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. जागावाटपाचा तिढा लवकरच सुटेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**- - होल्ड बाईट मुख्यमंत्री - - -**

त्याआधी देशाचे पहिले कृषीमंत्री पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीदिनी दिला जाणारा भाऊसाहेब देशमुख स्मृती पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आला.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र आले तर काँग्रेस स्वतंत्रपणे निवडणूक लढवेल, असं काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केलं. ते आज नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते. शक्य तिथे वंचित बहुजन आघाडीसोबत आघाडी करण्याचा प्रयत्न सुरू असून, समविचारी पक्षांसोबत आघाडी करण्याच्या सूचना स्थानिक नेत्यांना दिल्या असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

येत्या ५ जानेवारीपासून मनरेगा बचाओ अभियान सुरू करण्याची घोषणा काँग्रेसनं आज केली. मनरेगामधून महात्मा गांधी यांचं नाव काढून टाकण्याला आणि मजुरांच्या अधिकाराचं मदतीत रुपांतर करण्याच्या सर्व प्रयत्नांना लोकशाही पद्धतीनं विरोध करण्याचा निर्णय काँग्रेसच्या कार्यकारिणीनं आज जाहीर केला. या बैठकीला काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे आणि राहुल गांधी यांच्यासह इतर नेते उपस्थित होते.

<><><><><>

निवडणुकीत फायदा व्हावा यासाठी काँग्रेसनं मनरेगामध्ये महात्मा गांधी यांच्या नावाचा समावेश केल्याचा आरोप केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केला आहे. काँग्रेसनं मनरेगासाठीचा निधी सातत्यानं कमी केला, असंही ते म्हणाले. नव्या विकसित भारत जी रामजी कायद्यानुसार निर्णय दिल्लीत घेतले जाणार नसून गाव पातळीवर घेतले जाणार असल्याची आठवण त्यांनी करुन दिली. अधिक मागास पंचायतींना अधिक निधी मिळावा, सामाजिक लेखापरीक्षण व्हावं यासारख्या गोष्टी यात बंधनकारक केल्याचं चौहान म्हणाले.

<><><><><>

पश्चिम बंगालमधे मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षण प्रक्रियेसंबंधीच्या तक्रारींच्या सुनावणीला आजपासून सुरुवात झाली. सुनावणीसाठी राज्यभरात ३ हजारांपेक्षा जास्त केंद्र उभारण्यात आली आहेत. सुनावणीच्या पहिल्या टप्प्यात २००२ च्या मतदारयादीत नाव नसणाऱ्या ३२ लाख जणांना बोलावण्यात आलं आहे. मतदार आपली ओळख सिद्ध करण्यासाठी आधार कार्डसह बारा महत्त्वाची कागदपत्रं सादर करावी लागणार आहेत.

दुसरीकडे सखोल पुनरीक्षण प्रक्रियेनंतर आसाममधल्या साडे दहा लाख मतदारांची नावं मतदार यादीतून वगळण्यात आली. यात ९३ हजार मतदार योग्य कागदपत्र दाखल करू शकले नाहीत, ४ लाख ७८ हजार ९९२ मतदार मृत आढळले, ५ लाख २३ हजार ६८० मतदार स्थलांतरित आहेत, तर ५३ हजार ६१९ मतदार दुबार असल्याचं आढळलं. आता राज्यात दोन कोटी ५१ लाख ९ हजार ७५४ मतदार आहेत.

<><><><><>

नववर्ष स्वागत कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून दिल्ली पोलिसांनी ‘ऑपरेशन आघात थ्री पॉइंट ओ’ मोहीम राबवली. या अंतर्गत ९६६ जणांना ताब्यात घेतलं. शस्त्रास्त्रं, अमली पदार्थ, बेकायदा दारू आणि वाहनंही जप्त केली. संघटित गुन्हे, रस्त्यावरील हाणामाऱ्या, गुन्हे रोखण्यासाठी ही मोहीम राबवल्याची माहिती पोलिसांनी दिली.

<><><><><>

हैदराबाद इथं पुष्पा - टू सिनेमाच्या प्रिमियर शोवेळी झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी स्थानिक पोलिसांनी २३ जणांविरोधात आरोपपत्र दाखल केले. यात अभिनेता अलु अर्जुनचा देखील समावेश आहे. ज्या सिनेमागृहात ही घटना घडली त्या सिनेमागृहाच्या व्यवस्थापनाला मुख्य आरोपी करण्यात आलं आहे. गेल्यावर्षी डिसेंबरमध्ये झालेल्या या चेंगराचेंगरीत एका महिलेचा मृत्यू झाला होता आणि तिचा आठ वर्षीय मुलगा जखमी झाला होता.

<><><><><>

जम्मू आणि काश्मीरमधल्या किश्तवाड आणि दोडा जिल्ह्यात पाकिस्तानी दहशतवाद्यांना पकडण्यासाठी भारतीय लष्कराने मोहीम तीव्र केली आहे. सध्या या परिसरात तीस ते पस्तीस पाकिस्तानी दहशतवादी लपूर बसल्याची सुरक्षा दलाच्या सूत्रांची माहिती आहे. हे दहशतवादी उंच आणि बर्फाळ प्रदेशात लपल्याची शक्यता असल्यामुळे या ठिकाणी शोधमोहीम राबवली जात आहे.

<><><><><>

विकसित भारताच्या उद्दिष्ट गाठण्यासाठी  केंद्र सरकारनं यावर्षी विविध उपक्रम राबवले आहेत.  ऐकूया वस्तु आणि सेवा करामधे झालेल्या सुधारणांबद्दल…

**------व्हीसी ------**

*(जीएसटी अर्थात वस्तु आणि सेवा कररचना सुटसुटीत करण्यासाठी त्यात सुधारणा करण्याचा निर्णय सरकारनं या वर्षी घेतला. त्यानुसार ५ आणि १८ टक्के असे जीएसटीचे दोन टप्पे करण्यात आले. याचा सकारात्मक परिणाम अर्थव्यवस्थेवर आणि नागरिकांच्या जीवनावर झाला. जीएसटी सुधारणेनंतर यंदाच्या दिवाळीत वस्तुमालाची विक्री ६ ट्रिलियनपेक्षा जास्त झाली, गेल्यावर्षीपेक्षा ही विक्री २५ टक्के अधिक होती. ऑटोमोबाईल क्षेत्रातल्या विक्रीतही ४० टक्क्यापेक्षा जास्त वाढ झाल्याचं नोंदवलं गेलं. तसंच जीएसटी दर कमी करूनही ऑक्टोबर - नोव्हेंबर २०२५ या कालावधीतलं जीएसटी संकलन हे गेल्यावर्षीपेक्षा २ पूर्णांक ८ दशांश टक्क्यांनी वाढलं. याशिवाय आयकर सवलत मर्यादेत केलेली वाढ, आयुर्विम्यावरील जीएसटी दरात झालेली घट यामुळेही नागरिकांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळाला आहे. याशिवाय किराणा आणि जीवनावश्यक वस्तुही परवडणाऱ्या दरात उपलब्ध झाल्या आहेत.)*

**<><><><><>**

बांगलादेशातील केरानीगंजमध्ये आज दुपारी एका मदरशात स्फोट झाला. यात एक महिला आणि दोन मुलं जखमी झाली. मशीदीचं तसंच जवळच्या एका इमारतीचंही नुकसान झालं. या हल्ल्यानंतर पोलिसांच्या तपासात बॉम्ब बनवण्याची सुमारे अडीचशे किलो सामग्री जप्त करण्यात आली.

**<><><><><>**

गेल्या आठवड्यापासून थायलंड आणि कंबोडिया यांच्यात सुरू असलेलं युद्ध थांबवण्यासाठी आज दोन्ही देशांत युद्धबंदी करार झाला. दोन्ही देशाच्या संरक्षण मंत्र्यांनी सीमेवरील तपासणी नाक्यावर येऊन या करारावर स्वाक्षरी केली. मात्र त्यानंतरही थायलंडने हवाई हल्ले केल्याचा आरोप कंबोडियाच्या संरक्षण मंत्रालयाने केला आहे. तसंच थायलंडच्या ताब्यात असलेल्या १८ नागरिकांची सुटका करण्याची मागणी कंबोडियाने केली आहे. ७ डिसेंबरपासून दोन्ही देशात झालेल्या लढाईत थायलंडचे २६ सैनिक आणि ४४ नागरिक मृत्युमुखी पडले, तर कंबोडियाच्या ३० नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले.

**<><><><><>**

कॅनडातील भारतीय महिलांना संकटकाळी मदत करण्यासाठी टोरंटो शहरातील भारतीय दुतावासाने विशेष मदत केंद्र सुरू केले आहे. दूतावासानं महिलांसाठी २४ तास कार्यरत असणारी हेल्पलाइन सेवा देखील सुरू केली आहे. भारतीय पारपत्रधारी महिलांना कौटुंबिक हिंसा, छळ तसंच कायदेशीर समस्या सोडवणुकीसाठी ही हेल्पलाइन कार्यरत असेल. हे केंद्र एक महिला प्रशासकाद्वारे हाताळण्यात येणार असून टोरंटो येथील भारतीय वाणिज्य दूतावासातून काम करणार आहे.

<><><><><>

अमेरिकेतल्या ईशान्येच्या भागात आलेल्या हिमवादळामुळे हवाई वाहतूक सेवेवर परिणाम झाला असून अनेक उड्डाणं रद्द करण्यात आली आहेत, तर काही विलंबानं केली जात आहेत. न्यूयॉर्क, बोस्टन, शिकागो आणि टोरंटो इथल्या विमानतळांवरची हवाई वाहतूक सर्वात जास्त प्रभावित झाली आहे.

<><><><><>

रशियाने काल रात्रभर युक्रेनची राजधानी कींव मध्ये हल्ले करून युक्रेनच्या ऊर्जा उत्पादन आणि लष्करी उत्पादन कारखान्यांचं मोठं नुकसान केलं. युक्रेनने रशियाच्या नागरी वस्त्यांवर केलेल्या हल्ल्याचं प्रत्युत्तर म्हणून हे हल्ले केल्याचं रशियन संरक्षण मंत्रालयाने म्हटलं आहे. युध्दविरामाच्या शक्यतेवर चर्चा करण्यासाठी युक्रेनचे अध्यक्ष वोलोदीमीर झेलेन्स्की उद्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेणार आहेत.

//<><><><><>//